दैनिक
महासत्ता
बुधवार, ता. ३१ डिसेंबर २०२५

# मतदान जनजागृती अभियानांतर्गत महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम

कोल्हापूर, ता. ३० (प्रतिनिधी)–

कोल्हापूर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहरातील विविध महाविद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पथनाट्य, प्रभात फेरी, मतदान शपथ, पत्रलेखन, निबंध व रांगोळी स्पर्धा, दौड आदी विविध उपक्रमांचे आयोजिले होते.

या अभियानांतर्गत कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसरातील विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून मतदानाची तारीख, नागरिकांनी उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडावे, कोणत्याही आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला मतदान करावे, अशा महत्वाच्या विषयांवर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पथनाट्यात ३० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या विद्यार्थिनींना प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. श्रीमती पी. एम. पाटील यांचे मार्गदर्शन तर प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे प्रोत्साहन मिळाले.



मतदान जनजागृती अभियानांतर्गत महाविद्यालयांमध्ये शपथ घेताना विद्यार्थी–विद्यार्थिनी.

महावीर महाविद्यालय, शाहू कॉलेज व शहाजी लॉ कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. तसेच नाईट कॉलेज, डी. आर. के. कॉमर्स कॉलेज, विवेकानंद कॉलेज येथे विद्यार्थ्यांकडून मतदान विषयक शपथ घेण्यात आली. मतदान जनजागृती अभियान महानगरपालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रशासक के.मंजूलक्ष्मी, उपआयुक्त किरण कुमार धनवाडे तसेच प्राचार्य बाबासो उलपे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सकाळ TODAY
कोल्हापूर, बुधवार, ३१ डिसेंबर २०२५

# शहरातील महाविद्यालयांत मतदान जनजागृती



निमित्त शहरातील महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले.

कोल्हापूर, ता. ३० : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी शहरातील विविध महाविद्यालयांत उपक्रम राबवण्यात आले. त्यात पथनाट्य, प्रभात फेरी, मतदान शपथ, पत्रलेखन, निबंध, रांगोळी स्पर्धा, दौड आदींचा समावेश आहे.

कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसरातील विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले. मतदानासाठी बाहेर पडावे, आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला मतदान करावे, अशा विषयांवर जनजागृती केली. पथनाट्यात अनन्या जाधव, तेजल गावडे, भक्ती उतरंडे, प्राजक्ता साळुंखे, दुर्गा घोरपडे यांच्यासह ३० विद्यार्थिनी सहभागी होत्या. प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. पी. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रोत्साहन दिले. महावीर महाविद्यालय, शाहू कॉलेज व शहाजी कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. नाईट कॉलेज, कॉमर्स कॉलेज, विवेकानंद कॉलेज, शहाजी कॉलेज व शाहू कॉलेज येथील विद्यार्थ्यांकडून मतदान विषयक शपथ घेण्यात आली. प्रशासक के. मंजुलक्ष्मी, उपायुक्त किरणकुमार धनवाडे, प्राचार्य बाबासो उलपे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवले.